21 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकात्म सूत्रात चालतो ऑक्सफर्डचा कारभार

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : ऑक्स्फर्डमधील अनुभवांचे केले कथन

प्रतिनिधी
कोल्हापूर

ऑक्सफर्ड विद्यापीठ ही ज्ञानाची पंढरी असून ज्ञान देणे आणि ज्ञान घेणे, एवढेच कार्य तिथे शतकानुशतके चालू आहे. इंग्लंडच्या ज्ञानाचे व संस्कृतीचे केंद्र असलेल्या या ज्ञानपंढरीत एक महिना राहून मी ज्ञानमय झालो. तसेच एक देश, एक भाषा, एक संस्कृती आणि एक कायदा अशा एकात्म सूत्रात ऑक्सफर्डमधील कारभार चालतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

कुलगुरू डॉ. शिंदे हे युरोपियन युनियनच्या 'नमस्ते' प्रकल्पांतर्गत इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करून नुकतेच परतले. त्यांचे ऑक्सफर्ड येथील अनुभवाविषयी त्यांनी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थ्यांना ऑक्सफर्ड विद्यापीठाची माहिती देताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे.

तसेच त्यांनी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे ऑक्सफर्ड विद्यापीठासह इतर विद्यापीठे, विविध शहरे, प्रयोगशाळांची माहिती दिली. याप्रसंगी कोल्हापूरसह शिवाजी विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर करण्यात मोलाची कामगिरी बजावल्याबद्दल कुलगुरु डॉ. शिंदे यांचा विद्यापीठ परिवारातर्फे शाल, श्रीफळ व छत्रपती शिवरायांचा पुतळा देऊन बीसीयुडीचे संचालक डॉ. डी.आर. मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ऑक्सफर्डमध्ये शिस्त आणि संशोधन-अध्यापन संस्कृती अत्यंत अनुकरणीय आहे. संशोधन आणि अध्यापनाची तिथे इतकी अप्रतिम सांगड घातली गेली आहे की, त्यामुळेच या विद्यापीठातून आजपर्यंत ५० हून अधिक नोबेल विजेते आणि जागतिकस्तरावर गौरविले गेलेले शास्त्रज्ञ, साहित्यिक, कलाकार निर्माण झाले. या ज्ञानपंढरीला दरवर्षी जगभरातील ७० लाख लोक भेट देतात, ते केवळ या शैक्षणिक पंढरीच्या दर्शनासाठी. २२ हजार विद्यार्थी, १३ हजार कर्मचारी, १७,००० रोजगार, ४६०० व्यवसाय आदींच्या माध्यमातून अब्जावधी पौडांची उलाढाल या विद्यापीठात होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलगुरु पदावरील व्यक्तीने संशोधनासाठी म्हणून ऑक्सफर्डला येण्याचा भारताच्या तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या इतिहासातील पहिलाच प्रसंग असल्याची माहिती ऑक्सफर्डच्या कुलगुरू प्रा. लुईस रिचर्ड्सन यांनी आपल्याला दिल्याचे कुलगुरूंनी सांगितले. याचे श्रेय या स्कॉलरशिपचे महत्त्व ओळखून दौऱ्यासाठी अनुमती देणारे कुलपती विद्यासागर राव यांच्यासह युरोपियन युनियन, राज्य शासन तसेच परराष्ट्र मंत्रालय यांना जाते. त्यामुळे या सर्वांचे कुलगुरूंनी आभार मानले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. आर. व्ही. गुरव यांच्यासह शिक्षक,सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

21 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑक्सफर्डच्या ज्ञानपंढरीत राहून ज्ञानमय झालो

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : राजर्षी शाहू सभागृहात अनुभव कथन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : ऑक्सफर्ड विद्यापीठ ही ज्ञानाची पंढरी असून, ज्ञान देणे आणि ज्ञान घेणे, एवढेच कार्य तिथे शतकानुशतके सुरू आहे. इंग्लंडच्या ज्ञानाचे व संस्कृतीचे केंद्र असलेल्या या ज्ञानपंढरीत एक महिना राहून मी ज्ञानमय झालो, अशी प्रांजळ भावना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिंदे युरोपियन युनियनच्या नमस्ते प्रकल्पांतर्गत इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करून नुकतेच



डॉ. देवानंद शिंदे

परतले. त्यांच्या ऑक्सफर्ड येथील अनुभवाचा लाभ शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनींना मिळावा, यासाठी राजर्षी शाहू सभागृहात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, "एक देश, एक भाषा, एक संस्कृती आणि एक कायदा अशा एकात्म सूत्रात ऑक्सफर्डमधील कारभार चालतो. एकूणच तेथील शिस्त आणि संशोधन-अध्यापन संस्कृती अत्यंत अनुकरणीय आहे. संशोधन आणि अध्यापनाची तिथे इतकी अप्रतिम सांगड घातली गेली आहे, की त्यामुळेच या विद्यापीठातून आजपर्यंत ५० हून अधिक नोबेल विजेते आणि जागतिक स्तरावर गौरविले गेलेले शास्त्रज्ञ, साहित्यिक व कलाकार निर्माण झाले. ऑक्सफर्डमध्ये आणि एकूणच इंग्लंडमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे येथे जनतेच्या प्राधान्यक्रमावर सर्वप्रथम देश असतो. त्यानंतर संस्था, कुटुंब आणि सरतेशेवटी मी असतो."

ते म्हणाले, "ऑक्सफर्डला दरवर्षी जगभरातील सत्तर लाख लोक भेट देतात. ते केवळ या शैक्षणिक पंढरीच्या दर्शनासाठी. बावीस हजार विद्यार्थी, तेरा हजार कर्मचारी, सतरा हजार रोजगार, ४६०० व्यवसाय आदींच्या माध्यमातून अब्जावधी पौंडांची उलाढाल या विद्यापीठात होते. दीड लाख लोकवस्तीच्या ऑक्सफर्ड गावात सुमारे १२५ ग्रंथालये आहेत. जगातले सर्वांत मोठे ग्रंथभांडार येथे एकवटले आहे. जमिनीच्या वर जितकी इमारत दिसते, तितकेच ग्रंथागार जमिनीच्या खालीही असून, भूमिगतरित्या ही ग्रंथालये एकमेकांशी जोडलेली आहेत.

येथील मध्यवर्ती ग्रंथालयात सुमारे एक कोटी वीस लाख ग्रंथ असून, १६२० पासून प्रसिद्ध झालेले प्रत्येक पुस्तक या ठिकाणी उपलब्ध आहे. इतक्या प्रचंड संग्रहातील कोणतेही पुस्तक अवघ्या तीन मिनिटांत वाचकाला उपलब्ध करण्यात येते. या भेटीदरम्यान आपण केवळ बावीस ग्रंथालयांना भेट देऊ शकलो." त्यांनी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे ऑक्सफर्ड विद्यापीठासह भेटी दिलेली अन्य विद्यापीठे, विविध शहरे, प्रयोगशाळा यांची माहिती दिली. या प्रसंगी बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2017
पुढारी



कोल्हापूर : ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या यशस्वी संशोधन अभ्यास दौऱ्यासंदर्भात दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव व व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांच्याशी चर्चा करताना कुलगुरू देवानंद शिंदे. (छाया : संदीप मोरे)

# डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्याशी कुलगुरू डॉ. शिंदे यांची चर्चा

## ऑक्सफर्ड विद्यापीठ संशोधन अभ्यास दौऱ्याची दिली माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी दैनिक 'पुढारी'च्या मुख्य कार्यालयास भेट देऊन 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव व व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांची भेट घेतली. त्यांनी डॉ. जाधव यांना ऑक्सफर्ड विद्यापीठातील संशोधन अभ्यास दौऱ्याविषयी सविस्तर माहिती दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे हे युरोपियन युनियनच्या 'नमस्ते' प्रकल्पांतर्गत इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करून नुकतेच परतले आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी डॉ. जाधव यांची भेट घेतली. याप्रसंगी त्यांच्यात संशोधनासह विद्यापीठातील नवीन उपक्रमाबद्दल चर्चा झाली.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी महिनाभरात ऑक्सफर्ड विद्यापीठासह शहरातील विविध ठिकाणे, प्रयोगशाळा भेटीबद्दलची रंजक माहिती डॉ. जाधव यांना दिली. ऑक्सफर्ड विद्यापीठास दरवर्षी ७० लाख पर्यटक शैक्षणिक कामासाठी भेट देतात. याच्या माध्यमातून अब्जावधी रुपयांची उलाढाल होते. ऑक्सफर्ड विद्यापीठ परिसरातील सर्वकाही विद्यापीठाच्या मालकीचे आहे. तेथील प्रत्येकजण केवळ ज्ञानासंदर्भातच चर्चा करतो. तेथील संग्रहालये शिकवण देणारी मोठी केंद्रे आहेत. कुलगुरूपदावरील व्यक्ती संशोधनासाठी ऑक्सफर्ड विद्यापीठात येण्याची भारतातील पहिली वेळ असल्याचे ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या कुलगुरूंनी आपणास सांगितल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी आवर्जून सांगितले.

2 1 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# दीक्षांत समारंभाची तयारी युद्ध पातळीवर

## शुक्रवारी समारंभाचे आयोजन : डॉ. अनिल काकोडकर प्रमुख पाहुणे : ५० हजार विद्यार्थी, विद्यार्थीनी पदवी घेणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५२ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार २४ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाकडून या सोहळ्याची समारंभाची तयारी युद्ध पातळीवर सुरू आहे. पद्मविभूषण, राजीव गांधी विज्ञान आणि प्रौद्योगिकी आयोग महाराष्ट्र शासनचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय अणुउर्जा आयोगाचे माजी संचालक डॉ. अनिल काकोडकर यांना दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले आहे, अशी माहिती परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी दिली.

दीक्षांत समारंभाच्या नियोजनासाठी अस्थापना मार्फत २७ समित्या गटीत केल्या आहेत. या समित्यांमधून एकूण ४३० कर्मचारी कार्यरत आहेत. लेखाविभाग व अस्थापनाकडूनाच्या परवानगीने कर्मचारी काम करीत आहेत. कुलगुरू अधिकार मंडळ, पाहुणे, विद्यार्थ्यी यांच्यासाठीच्या गाऊनची स्वच्छता आणि नवीन खरेदीही केली जात आहे. प्रत्येक समितीला वेगवेगळया कामाची जबाबदारी दिली आहे.



पदवी प्रमाणपत्र छापून पूर्ण झाली आहेत. सध्या पाहुण्यांची भाषण छापण्याचे काम सुरू आहे. यावर्षी सर्वसाधारण ५० हजार पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. लोककला केंद्रात डेकोरेशन कसे करायचे, सकाळच्या ग्रंथ दिंडीपासून ते प्रमुख कार्यक्रमापर्यंतच्या नियोजनाचा आराखडा जवळपास तयार झाला आहे.

शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी जवळपास ५० हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यापैकी जवळपास २५ हजार विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रत्यक्ष पदवी घेणार आहेत. शिवाय २५ हजार विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्रे पाठवली जाणार आहेत. २०० हून अधिक विद्यार्थ्यांना पीएच. डी. व एम. फिल. पदवी प्रदान केली जाणार आहे. फॅकल्टी ऑफ आर्ट ॲन्ड फायनल आर्ट , सोशल सायन्स, विज्ञान विभाग, कॉमर्स विभाग, शिक्षणशास्त्र विभाग, अभियांत्रिकी आदी विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र व्यासपीठावर दिली जाणार आहेत.

दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाच्या बैठका सुरू आहेत. ग्रंथमहोत्सवाचे आयोजन, पीएच. डी., एम. फील.च्या विद्यार्थ्यांना पदवी कोणाच्या हस्ते प्रदान करावयची याचे नियोजन या बैठकांमध्ये ठरत आहे. तर गुणवंत विद्यार्थ्यांना विविध पारितोषिकाने सन्मानित करण्यात येणार आहे. राष्ट्रपती सुवर्णपदक पदकासाठी विद्यार्थ्यांच्या मुलाखती झाल्या. या मुलाखतीतून एका विद्यार्थ्याला राष्ट्रपती सुवर्णपदक प्रदक दिले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2017
सकाळ

# विद्यापीठात ५३ व्या दीक्षान्त सोहळ्याची जय्यत तयारी



कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठातर्फे शुक्रवारी (ता. २४) होणाऱ्या ५३ व्या दीक्षान्त सोहळ्याची तयारी सुरू झाली आहे. सोहळ्यात ४९ हजार ९५१ पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्रांचे वाटप केले जाणार असून २२ हजार ९०० प्रत्यक्ष विद्यापीठात, तर उर्वरित प्रमाणपत्रे बाय पोस्ट पाठवली जाणार आहेत. त्याबाबतची माहिती परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी दिली. लोककला केंद्रात मुख्य सोहळा होत असून या परिसरात पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्रांचे वाटप करण्यासाठी कक्ष उभे केले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना मोबाइलवर दोन वेळा एसएमएस पाठवून कोणत्या कक्षात त्यांना पदवी प्रमाणपत्र मिळेल, याची माहिती दिली जाणार आहे. विद्यापीठाच्या वेबसाईटवरील लिंकद्वारे विद्यार्थ्यांनी त्यांची माहिती भरल्यास कोणत्या कक्षात त्यांना प्रमाणपत्र मिळेल, हे समजणार आहे.

21 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी महाराजांनी स्वराज्य, सुराज्य निर्माण केले : डॉ. गवळी

## डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमाला

कोल्हापूर : प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आहे. त्यांनी लष्करी वतनदारी पद्धती नष्ट करून राज्यात शांतता व सुव्यवस्था राखली. प्रजेचे रक्षण ही जबाबदारी मानून स्वराज्य व सुराज्य निर्माण करण्याचे काम केले, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. पी. ए. गवळी यांनी व्यक्त केले.

छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र व इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत 'छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासकीय धोरण' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. पद्मजा पाटील होत्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. पी. ए. गवळी. शेजारी डॉ. पद्मजा पाटील, प्रा. डॉ. निलांबरी जगताप. (छाया : तय्यब अली)

डॉ. गवळी यांनी शिवाजी महाराजांचे प्रजाहितदक्ष, सुधारणावादी दृष्टिकोन, समदृष्टी, धर्मसहिष्णूता, गनिमी युद्धतंत्र, निःपक्षपातीपणा, रोखठोक भाषा अशा विविध पैलूंवर प्रकाश टाकला. आज्ञापत्रे व इतर कागदपत्रांविषयी माहिती दिली.

डॉ. पद्मजा पाटील म्हणाल्या, शिवाजी महाराजांची विविध कौशल्ये आजच्या युवकांनी आत्मसात करून समाजात तशी भूमिका घेण्याचा प्रयत्न करावा. प्रा. डॉ. नंदा पारेकर, प्रा. डॉ. अवनिश पाटील, उमेश भोसले, अविनाश भाले उपस्थित होते.

छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. निलांबरी जगताप यांनी संयोजन केले. दि. २२ रोजी 'पेशवेकालीन सरंजामशाही' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

21 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**पी. ए. गवळी : शिवाजी विद्यापीठात आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमाला**

# शिवरायांनी प्रजेचे रक्षण ही जबाबदारी मानली

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रजेचे रक्षण ही जबाबदारी मानून स्वराज्य व सुराज्य निर्माण करण्याचे काम केले. लष्करी वतनदारी पद्धती नष्ट करुन राज्यात शांतता व सुव्यवस्था राखली. या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. पी. ए. गवळी यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासकीय धोरण' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र व इतिहास विभागाच्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्मजा पाटील होत्या.

यावेळी डॉ. पाटील म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराज यांची विविध कौशल्ये आजच्या युवकांनी आत्मसात करावीत. या कौशल्यांचा वापर करुन समाजात तशी भूमिका घेण्याचा प्रयत्न करावा.

या कार्यक्रमास प्रा. डॉ. नंदा पारेकर, निलांबरी जगताप, अवनिश पाटील, उमेश भोसले, अविनाश भाले, प्रा. राऊत, आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठात सोमवारी आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत डॉ. पी. ए. गवळी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून प्रा. डॉ. पद्मजा पाटील, निलांबरी जगताप उपस्थित होत्या.

21 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवरायांचे कर्तृत्व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे

## डॉ. गवळी : डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व व व्यक्तिमत्त्व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे होते. त्यांनी लष्करी व वतनदारी पद्धत नष्ट करून राज्यात शांतता व सुव्यवस्था राखली. प्रजेचे रक्षण हे कर्तव्य मानून स्वराज्य व सुराज्य निर्माण केले, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे माजी प्रमुख डॉ. पी. ए. गवळी यांनी व्यक्त केले.

छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र व इतिहास विभाग शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित



**कोल्हापूर : येथे डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. पी. ए. गवळी. शेजारी डॉ. पद्मजा पाटील, प्रा. नीलांबरी जगताप.**

डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासकीय धोरण' या विषयावर त्यांनी दुसरे पुष्प गुंफले. इतिहास विभागप्रमुख डॉ. पद्मजा पाटील अध्यक्षस्थानी होत्या.

छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रजाहितदक्षपणा, सुधारणावादी दृष्टिकोन, समदृष्टी, धर्मसहिष्णुता, गनिमी युद्धतंत्र, निष्पक्षपातीपणा अशा विविध पैलूंवर आज्ञापत्र व इतर कागदपत्रांद्वारे डॉ. गवळी यांनी प्रकाश टाकला. डॉ. पाटील म्हणाल्या, "शिवाजी महाराजांची विविध कौशल्ये युवकांनी आत्मसात करून समाजात तशी भूमिका घ्यावी." या वेळी प्रा. डॉ. नंदा पारेकर, प्रा. डॉ. अवनिश पाटील, उमेश भोसले, अविनाश भाले, प्रा. राऊत आदी उपस्थित होते. छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक प्रा. नीलांबरी जगताप यांनी संयोजन केले.

**उद्या तिसरे पुष्प**

बुधवारी (ता. २२) सकाळी ११ वाजता याच व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प डॉ. गवळी, 'पेशवेकालीन सरंजामशाही' या विषयावर गुंफणार आहेत.

2 1 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोशल मीडियाची शक्ती सर्वसामान्यांच्या हातात

## – निखिल वागळे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये आयोजित 'आजचे वर्तमान, प्रसारमाध्यमे' या विषयावर बोलताना निखिल वागळे. सोबत प्रा. राजन गवस, मेघा पानसरे. (छाया : अमर कांबळे)

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जगभरात प्रसारमाध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. या बदलत्या युगात सोशल मीडियाची मोठी शक्ती सर्वसामान्यांच्या हातात आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठात मराठी व विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आजचे वर्तमान आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर बोलत होते.

वागळे म्हणाले, माध्यमांच्या वाढीसाठी भारत हा पूरक असा देश आहे. जगभरात माध्यम क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या लोकांचे लक्ष या देशाकडे वेधले गेले आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली. त्यामुळे गेल्या पंचवीस वर्षांत येथे मोठ्या प्रमाणात प्रसारमाध्यमांची संख्या वाढली आहे. आता नवमाध्यमांची वाढ होणार आहे. भविष्यात डिजिटल माध्यमातून लोक बातम्या वाचतील. त्याचबरोबर सध्याच्या काळात सोशल मीडियाची मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

ते म्हणाले, सध्या सोशल मीडिया चुकीच्या व्यक्तींच्या हातामध्ये गेला आहे. त्यामुळे काही विकृती या माध्यमातून चुकीचा प्रचार करीत आहेत. त्यामुळे तरुणांनी योग्य प्रकारे सोशल मीडियाचा वापर करून त्याचा दुरुपयोग थांबविला पाहिजे. नव्याने पत्रकारितेमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांनी देशाच्या संविधानाशी प्रामाणिक राहून काम केले पाहिजे. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. राजन गवस यांनी केले. आभार मेघा पानसरे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2017
सकाळ

# सोशल मीडिया हेच पत्रकारितेचे भविष्य : वागळे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : सोशल मीडिया हेच पत्रकारितेचे भविष्य असेल व लोकांच्या प्रकटनाचे ते महत्त्वाचे माध्यम बनेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी व विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'आजचे वर्तमान आणि प्रसारमाध्यमे' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. त्यांनी बदलत्या पत्रकारितेचे वास्तव मांडून रोखठोक मते व्यक्त केली. वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. श्री. वागळे म्हणाले, "सत्य लिहिणे हाच पत्रकाराचा पिंड हवा. आज माध्यमांत अनेकांचा हस्तक्षेप वाढला आहे. काय लिहायचे, काय नको, हे ठरविले जात आहे. संशोधनात्मक पत्रकारिता का होत नाही, याचे कोडे उलगडत नाही." ते म्हणाले, "येत्या काळात वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्या कालबाह्य होण्याची शक्यता आहे. सोशल मीडियाद्वारे लोक व्यक्त होऊ लागले आहेत. पत्रकारितेतील सत्य लपवण्याचा प्रयत्न होईल, तेव्हा सोशल मीडियाद्वारे त्याला वाचा फुटेल. जगभरात त्याच दिशेने पावले पडत आहेत." मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. मेघा पानसरे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 FEB 2017
पुण्यनगरी

# करिअरसाठी महाविद्यालयीन जीवन महत्त्वाचे

## -डॉ. डी. आर. मोरे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** युवा पिढीने महाविद्यालयीन जीवनात आपले करिअर घडविण्यासाठी सावधपणे आत्मविश्वासाने पाऊल टाकले पाहिजे. यासाठी महाविद्यालयीन जीवनात करिअर घडविण्यासाठी त्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे बी.सी.यू.डी. संचालक, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे केले. ते डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

महाविद्यालयीन जीवनात विविध स्पर्धांना आत्मविश्वासाने सामोरे गेल्यास यश निश्चित मिळते. यासाठी मन आणि शरीर खंबीर पाहिजे. महाविद्यालयात आपली गुणवत्ता वाढीवर भर दिला पाहिजे.

प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. उदयसिंह माने-पाटील यांनी केले. वार्षिक अहवालाचे वाचन कार्याध्यक्ष प्रा. अशोक कांबळे यांनी केले. जिमखाना विभागाच्या अहवालाचे प्रा. मुजफ्फर लगीवाले यांनी वाचन केले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांत यश मिळविल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी फनीगेम्स, फूडस्टॉल व शेला-पागोटे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. ए. जी. खोत यांनी आभार मानले.

प्राचार्या शैलजा साळुंखे, प्रा. पी. सी. दिवगेकर, प्रा. डॉ. ए. ई. कोरडे, प्रा. आर. आर. मोरे, डी. पी. पी. यादव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2017
सकाळ



# एम.बी.ए. विभागातर्फे सिंहावलोकन - २०१७

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठातील एम.बी.ए. विभागातर्फे सिंहावलोकन-२०१७ कार्यक्रम नुकताच झाला. बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक अनंत घाटे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. डॉ. एच. एम. ठकार यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मार्गदर्शन केले. स्टार्ट अप प्लान बिझनेस क्वीझ, मॉक रिक्रुएटमेंट, बेस्ट सेल्स एक्झिक्युटिव्ह, केस स्टडी प्रकारात स्पर्धा झाली. त्यात तीनशे स्पर्धकांनी सहभाग घेतला. विकी चावला, डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. डॉ. दीपा इंगवले, गंधाली खारगे, स्मिता कांबळे, संकेत रावण यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

21 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# करिअरसाठी योग्य जोखीम स्वीकारा

## विलास नांदवडेकर : 'सिंहावलोकन'मध्ये ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी करिअर घडविण्यासाठी योग्य जोखीम स्वीकारावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील एमबीए विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी आयोजित केलेल्या 'सिंहावलोकन' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे विभागीय व्यवस्थापक अनंत घाटे प्रमुख उपस्थित होते. कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी सोयीस्कर वातावरणातून बाहेर येऊन जगाच्या स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे. कोणत्याही स्पर्धेला न घाबरता नावीन्यपूर्ण कल्पनांना वाव द्यावा. कार्यक्रमात 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे विभागीय व्यवस्थापक अनंत घाटे यांनी बँकिंग क्षेत्रातील संधींची माहिती दिली. यावेळी एमबीए विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग प्रमुख डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. दरम्यान, 'सिंहावलोकन' अंतर्गत अॅड अस्त्रा, 'स्टार्ट अप प्लॅन बिझनेस क्वीझ', 'बेस्ट सेल्स एक्झिक्युटिव्ह', आदी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात सुमारे तीनशे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील विजेत्यांना विकी चावला यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. डॉ. दीपा इंगवले, गंधाली खारगे, स्मिता कांबळे, संकेत रावण यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 FEB 2017
पुढारी

# विद्यापीठात उद्यापासून संगीत-नाटक महोत्सव

कोल्हापूर (**प्रतिनिधी**) : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. २२ व २३ रोजी संगीत-नाटक महोत्सवाचे आयोजन केले आहे. बुधवारी (दि.२२) सकाळी १० वाजता पुणे येथील ज्येष्ठ नाटककार श्याम मनोहर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. प्रथम सत्रात श्याम मनोहर हे 'नाटक : संकल्पना व संहिता', प्रा. केशव देशपांडे 'मराठी नाटक व दिग्दर्शन' या विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारी मुक्त संवाद कार्यक्रम, सायंकाळी ५ वाजता नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे सादरीकरण, गुरुवार (दि.२३) रोजी सकाळी ११ वाजता कर्नाटक विद्यापीठाचे प्रा.डॉ. मृत्यूजंय अंगडी सप्रयोग व्याख्यान देतील. द्वितीय सत्रात मधुसुदन शिखरे यांचे शास्त्रीय गायन, दुपारी ३ ते ५ या वेळेत संगीत विभागातील विद्यार्थी सादरीकरण करणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. एन.व्ही. चिटणीस यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2017
लोकमत

# उद्यापासून रंगणार 'संगीत-नाटक' महोत्सव

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे बुधवारी (दि. २२) आणि गुरुवारी (दि.२३) संगीत-नाटक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठातील या महोत्सवात ज्येष्ठ नाटककार श्याम मुनोहर, प्रा. केशव देशपांडे, मृत्युंजय अंगडी यांचे व्याख्यान, मुक्त संवाद, मधुसुदन शिखरे यांचे शास्त्रीय गायन, आदी कार्यक्रम होणार आहेत.

संगीत व नाट्यशास्त्र विभागातील या महोत्सवाचे उद्घाटन बुधवारी (दि. २२) सकाळी दहा वाजता ज्येष्ठ नाटककार श्याम मनोहर यांच्या प्रमुख उपस्थितीत, तर कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होईल. त्यानंतरच्या पहिल्या सत्रात ज्येष्ठ नाटककार मनोहर यांचे 'नाटक : संकल्पना व संहिता' या विषयावर आणि दुसऱ्या सत्रात प्रा. केशव देशपांडे यांचे 'मराठी नाटक व दिग्दर्शन' या विषयावर व्याख्यान होईल. दुपारी ३. ३० वाजता मुक्त संवाद, तर सायंकाळी ५ वाजता नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे सादरीकरण होणार आहे. गुरुवारी (दि. २३) सकाळी कर्नाटक विद्यापीठाचे प्रा. मृत्युंजय अंगडी यांचे सप्रयोग व्याख्यान, तर दुसऱ्या सत्रात मधुसुदन शिखरे यांचे शास्त्रीय गायन, दुपारी ३ वाजता संगीत विभागातील विद्यार्थिनी कार्यक्रम सादर करतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 FEB 2017
Times of India

# Workshop for nodal officers on Feb 23

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will be conducting a workshop for the nodal officers on February 23 at Gopal Krishna Gokhale College here, states an SUK circular.

The nodal officers belong to the colleges affliated with the SUK. These officers are associated with the All India Survey on Higher Education (AISHE), the circular added.

Attendence of the nodal officers is must for the workshop. The colleges must also have one representative at the event.

According to an SUK official, the workshop is a routine academic activity which is organised once in a year. Similar workshops were earlier conducted in Sangli and Satara districts.

"AISHE is an initiatve by the ministry of human resource development and is important for policy making. SUK has been sending the academic data within the stipulated deadline for the respective academic year," said an SUK official.

AISHE covers information of an educational institute on enrolment at various levels such as human resources, infrastructure, income and the expenditure. This includes the courses which may includ arts, science, agriculture and teacher education. TNN